MHAU090009752025

## <u>निशाणी क्र. १ खालील आदेश</u>

अर्जदार क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळेणेकामी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ च्या साक्षीनुसार, त्यांचे वडील व अर्जदार क्र. २ यांचे पती आण्णासाहेब बपाजी नरके, यांचा मृत्यू दि.०४/१२/२०२४ रोजी मौजे टाकळी अंबड, ता. पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर येथे झालेला आहे. तसेच मयताची आई अंजनाबाई हिचा देखील मृत्यु झालेला आहे. अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र दैनंदिन व्यवहारासाठी पाहिजे आहे व त्याकरिता त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदारांनी नि.क्र.११ वर त्यांच्या वडीलांचे मृत्यूप्रमाणपत्र, नि.क्र.१२ वर मयताची आई अंजनाबाई हिचे मृत्युची नोंद नसल्याबाबतचे अनुपब्लधता प्रमाणपत्र तसेच नि.क्र.१३ व १४ वर अर्जदारांच्या आधारकार्डची प्रत इ. कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच अर्जदार क्र.१ याने नि.क्र.९ वर शपथपत्र दाखल करुन त्यांचे वडील व आजी मयत असल्याचे शपथेवर सांगितले आहे. तसेच न्यायालयात त्याच्या साक्षीमध्येसुध्दा त्याबाबत सांगितले आहे. तसेच नि.क्र.१५ वर 'दैनिक मराठवाडा केसरी' दि.१९/११/२०२५ रोजीची प्रत दाखल केली आहे.

३. अर्जदार क्र. १ याने नि.क्र.९ वर त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराचा पुरावा असे दर्शवितो की, अर्जदार क्र. १ व २ हेच मयत आण्णासाहेब बपाजी नरके यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. नि.क्र.११ वरुन असे दिसून येते की, आण्णासाहेब बपाजी नरके यांचा मृत्यू झाला आहे. अर्जदारांशिवाय त्यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

४. अर्जातील कथनास व विनंतीस आक्षेप आहे किंवा नाही पडताळून पाहणेकामी अर्जातील मजकूराची जाहीर नोटीस स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे.

सदर जाहीर नोटीस ही नि.क्र.१५ वर आहे. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध व आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

५. अर्जातील कथन, तोंडी व लेखी पुरावा इत्यादींचा विचार करता हे दिसून येते की, अर्जदार क्र. १ व २ हेच मयत आण्णासाहेब बपाजी नरके यांचे वारस आहेत. त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. सबब असा निष्कर्ष काढण्यात येतो की, अर्जदार हेच मयताचे वारसाचे प्रमाणपत्र (Formally recognized heirs) मिळविण्यास पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार १ व २ हेच मयत आण्णासाहेब बपाजी नरके यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार यांना निर्गमीत करण्यात यावे.

३. सदरचे वारस प्रमाणपत्राचा अर्जदार यांनी अर्जामध्ये ज्या कारणासाठी सदरचे प्रमाणपत्र मागितले आहे, त्याचसाठी उपयोग करावा. तसेच सदर प्रमाणपत्राचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करु नये. तसेच अर्जदार यांनी सदर वारस प्रमाणपत्र मिळाल्यापासून सहा महिन्यांच्या आतमध्ये त्यांनी सदर वारसा प्रमाणपत्राचा कुठे व कोणत्या कामासाठी वापर केला याबाबत या न्यायालयास कळविण्यात यावे.

४. सबब संचिका निकाली काढण्यात आली.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.03.30 16:52:48 +0530

दिनांक – २४/०३/२०२६

**(जी व्ही. गांधे)**
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पैठण.